# कोपरी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २६७ /२०२५ दि. 09 /१२/ २०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी,** कोपरी वाहतूक उपविभागाचे हद्दीत रेल्वेने प्रवास करणारे अनेक प्रवासी हे आपली दुचाकी वाहने ही हरिश्चंद्र राऊत मार्गावर दोन्ही बाजुस अस्ताव्यस्तपणे उभी करीत असतात. त्यामुळे सकाळी व संध्याकाळी गर्दीच्या वेळी वाहतूक कोंडी होत असते. तसेच जवळच अग्नीशामक केंद्र असल्याने आपात्कालीन परीस्थीतीमध्ये अग्नीशामक केंद्राचे वाहनास सदर मार्गावरुन जाताना अडचण निर्माण होवु शकते. त्यामुळे खालील नमुद ठिकाणी पी १ पी २, नो पार्कींग, **No Entry** करण्यात येत असुन सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| अ.क्र. | पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | पंजाब नॅशनल बॅक, कोपरी पुर्व ते अग्नीशामक केंद्र पावेतो रोडच्या डाव्या बाजुस | **पी १** | १०० मीटर | ०७:०० ते १५:०० |
| २ | अग्नीशामक केंद्र, कोपरी पुर्व ते श्री राधाकृष्ण मंदिर पावेतो रोडच्या डाव्या बाजुस | **पी १** | ५० मीटर | ०७:०० ते १५:०० |
| ३ | श्री राधाकृष्ण मंदिर ते अग्नीशामक केंद्र, कोपरी पुर्व पावेतो रोडच्या उजव्या बाजुस | **पी २** | ५० मीटर | १५:०० ते २३:०० |
| ४ | अग्नीशामक केंद्र, कोपरी पुर्व ते पंजाब नॅशनल बॅक, कोपरी पुर्व शाखा पावेतो रोडच्या उजव्या बाजुस | **पी २** | १०० मीटर | १५:०० ते २३:०० |
| ५ | भिमशक्ती चौक, सिध्दार्थ नगर सॅटिस ब्रिज पिलर नं.१५ ते पिलर नं.१७ मधील मोकळी जागा | **नो पार्किंग** | ३० मीटर | २४ तास |
| ६ | ठाणे रेल्वे स्टेशन पुर्व समोर सॅटिस ब्रिज पिलर नं.३२ ते पिलर नं. ३६ मधील मोकळी जागा | **नो पार्किंग** | ४० मीटर | २४ तास |
| ७ | **No Entry** :– सिध्दार्थ नगर, भिमशक्ती चौक कडुन दिपक लस्सी सेंटरकडे जाणाऱ्या रोडवर सर्व प्रकारच्या वाहनांना **(दुचाकी वगळुन) भिमशक्ती चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. | | | |
| ८ | **No Entry** :– दिपक लस्सी सेंटरकडुन हसिजा कॉर्नर कडे जाणाऱ्या रोडवर सर्व प्रकारच्या वाहनांना **दिपक लस्सी सेंटर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. | | | |

सदर अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून पुढे कायमस्वरुपी लागू करण्यात येत आहे.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५/वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी** :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई/बृन्मुंबई/मिरा भाईदर महानगरपालिका.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग ठाणे.